# कंदलगाव येथील जीवन ज्योत माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत सायबर सुरक्षाचे मार्गदर्शन

लोकप्रधान न्युज नेटवर्क



दक्षिण सोलापूर तालुक्यातील कंदलगाव येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोला-पूर विद्यापीठातील संगणक शास्त्र संकुल, क्वीक हिल फाउंडेशन पुणे आणि जीवन ज्योत माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला कंदलगाव येथे सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जीवन ज्योत माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेचे प्राचार्य पी एम कमळे हे होते यावेळी संगणक शास्त्र संकुलातील राहुल शिंदे व मोहिनी दुधाळ यांनी सांगितले की, फसवणूक होऊ नये म्हणून त्याबद्दल खात्री करूनच त्यावर विश्वास ठेवावा. त्यासाठी ओटीपी कोणास सांगू नये.

अनोळखी नंबर बरून आलेले फोन कॉल्सची पडताळणी करावी. इतर व्हाट्सअप व सोशल मीडियावर आलेल्या मेसेजेस व लिंकची शहानिशा करूनच पुढील प्रक्रिया करावी. पासवर्ड स्ट्राँग वापरून स्वतःची माहिती सुरक्षित करावी. त्यासाठी मोबाईल, कॉम्प्युटर, लॅपटॉप आदी साधनांवर अधिकृत अँटीव्हायरसचा वापर करावा. या कार्यक्रमासाठी जीवन ज्योत माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेतील एकूण ३८२ विद्यार्थीनींनी आपला सहभाग नोंदविला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले जीवन ज्योत माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेचे प्राचार्य पी एम कमळे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळेस जीवन ज्योत माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग आणि प्रशालेतील विद्यार्थ्यां बहुसंख्येने उपस्थित होते .

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशालेचे शिक्षक अनिल गावडे यांनी केले. या कार्यक्रमाचे आभार प्रशालेचे शिक्षक आरुण गावडे यांनी मांडले.